# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १५/०५/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक
## वाहनासह एकुण २२,६५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १४/०५/२०२४ रोजी पोस्टे कन्हान येथील पोलीस स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, एक अशोक लेलॅंड १४ चाकी ट्रक क्र. एम.एच—४०/सि.डी—९९७५ मनसर कडुन अवैधरीत्या विनापरवाना रेती (वाळु) ट्रकमध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून नाकाबंदी केली असता अशोक लेलॅंड १४ चाकी ट्रक क्र. एम.एच—४०/सि.डी—९९७५ चा चालक **आरोपी नामे— सोनु उर्फ शाहरूख वल्द रोउफ खान, वय २९ वर्ष, रा. प्रतापगड उ.प्र.** याला स्टाफने थांबवून पाहणी केली असता वाहनामधील एकुण अंदाजे १० ब्रास रेती मिळून आल्याने सदर वाहन चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून अशोक लेलॅंड १४ चाकी ट्रक क्र. एम.एच—४०/सि.डी—९९७५ किंमती २२,०००००/—रू. त्यामध्ये १० ब्रास रेती किंमती ६०,०००/— रु. व ०१ मोबाइल किंमती ५०००/—रू. असा एकूण २२,६५,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करून **चालक आरोपी नामे— १) सोनु उर्फ शाहरूख वल्द रोउफ खान, वय २९ वर्ष, रा. प्रतापगड उ. प्र. २) मालक नामे— २) वैभव किशन वैरागडे, वय २५ वर्ष, रा. पुलगाव जि. वर्धा** यांचेविरुद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ३७९, १०९ भादंवि., सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९६६, सहकलम ४, २१ खानी आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम—१९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ अन्वये पो. स्टे. कन्हान येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, पोहवा सतिश फुटाणे, पोशि आतिश मानवटकर, चालक आशिष बोरकर यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर